महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७९७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/संकीर्ण/२०२१/ ४५८३ दिनांक : 14 OCT 2021

प्रति,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदविका/पदवी/पदवित्तर पदवी संस्था
पुणे विभाग, पुणे.

**विषय : भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्याचे अनुषंगाने करावयाचे विविध उपक्रम**

संदर्भ : १. उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१०१/आस्था-२,दि.२०.०८.२०२१
२. संचालनालयाचे पत्र क्रमांक १६/आस्था/संकीर्ण/२०२१/२६५, दि.२५.०८.२०२१
३. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १६/आस्था/संकीर्ण/२०२१/२७३ दि.१३.०९.२०२१

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्रान्वये दिलेल्या सूचनानुसार भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करण्याचे अनुषंगाने पुणे विभागातील सर्व तंत्रशिक्षण संस्थांनी पुढील प्रमाणे उपक्रम राबवायचे आहेत.

**१. विभागस्तरीय प्रोजेक्ट एक्झिबिशन –**

पुणे विभागातील सर्व तंत्रनिकेतने व अभियांत्रिकी महाविद्यालये यातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या प्रोजेक्टचे ( प्रकल्पाचे ) एक्झिबिशन आयोजित करून प्रोजेक्ट कॉम्पिटीशन आयोजित करावयाची आहे. (त्याकरीता खालील प्रमाणे जबाबदारी देण्यात येत आहे.) त्याच्या समन्वयनाची जबाबदारी खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रदर्शनाचा तपशील | समन्वयक संस्थेचे नाव | प्रदर्शनाचा अपेक्षीत कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पदविका अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे प्रकल्पांचे प्रदर्शन (१) | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | नोव्हेंबर २०२१ |
| २ | पदविका अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे प्रकल्पांचे प्रदर्शन (२) | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे | मे २०२२ |
| ३ | पदवी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे प्रकल्पांचे प्रदर्शन (१) | विश्वकर्मा इन्स्टिटयूट टेक्नोलॉजी पुणे | नोव्हेंबर २०२१ |
| ४ | पदवी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे प्रकल्पांचे प्रदर्शन (२) | ऑल इंडिया श्री शिवाजी इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी पुणे | मे २०२२ |
| ५ | पदवितर पदवी अभियांत्रिकी विद्यार्थ्यांचे प्रकल्पांचे प्रदर्शन (१) | | |

वर नमूद केलेल्या प्रोजेक्ट व एक्झीबीशन मध्ये प्रत्येक प्रदर्शनात तीन पारितोषिके दयावीत. संस्थांनी विभागातील स्थानिक समस्या, प्रगत तंत्रज्ञान व महत्वपूर्ण तांत्रिक संकल्पना इत्यादी बाबींशी संबंधीत प्रकल्पांना प्राधान्य देऊन स्पर्धा आयोजित कराव्यात. स्पर्धा आयोजनापूर्वी त्याची माहिती पत्रके सर्व संस्थांना व विभागीय कार्यालयास वेळेत पोहचतील याची दक्षता घ्यावी.

## २. विभागस्तरीय संशोधन परिषदा (Conferences)

पुणे विभागातील अभियांत्रिकी महाविद्यालयांनी संशोधन परिषदांचे (Research Confernces) आयोजन करावयाचे आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे. या संशोधन परिषदा आयोजित करताना संस्थानी आपल्या परिसरातील औद्यागिक आस्थापनांना सहभागी करून घ्यावे.

| अ.क्र | परिषद आयोजनासाठी समन्वयक संस्था | परिषदेचा अपेक्षित कालावधी | विषयांचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे. | एप्रिल/ मे २०२२ | Environment, Clean Water, Electric Mobility, Sustainable Development, Digital literacy, Clean fuel etc. |
| २ | शासकीय अभियांत्रिकी व संशोधन संस्था अवसरी | जुलै/ ऑगस्ट २०२२ | |
| ३ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड | एप्रिल/ मे २०२२ | |
| ४ | आरआयटी, राजारामनगर | एप्रिल/ मे २०२२ | |
| ५ | पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे | जुलै/ ऑगस्ट २०२२ | |
| ६ | वालचंद इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर | एप्रिल/ मे २०२२ | |

वरील सर्व संस्थांनी सुकाणू समिती स्थापन करून परिषदांचा तपशील कालावधी आणि विषयांचे तपशील आपसांत चर्चा करून ठरवावा आणि तसे या कार्यालयास कळवावे.

तसेच वर नमूद केलेल्या संस्थाव्यतिरीक्त ज्या संस्थांना अशा परिषदा आयोजित करावयाच्या आहेत त्यांनी या कार्यालयाशी संपर्क करावा.

## ३. विभागीय शोधनिबंध स्पर्धा-

विभागातील सर्व अभियांत्रिकी पदवी व पदविका, औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका संस्थांतील विद्यार्थ्यांकरीता शोध निबंध स्पर्धा आयोजित करावयाच्या आहेत त्याच्या समन्वयाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | शोधनिबंध स्पर्धेचा स्तर | समन्वयाची जबाबदारी | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी पदवी | डीवायपाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, आकुर्डी व जेएसपीएमएस राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,पुणे | एप्रिल २०२२ व सप्टेंबर २०२२ |
| २ | अभियांत्रिकी पदवीका | शासकीय तंत्रनिकेतन, पुणे व कुसरोवाडीया इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे | |
| ३ | औषधनिर्माणशास्त्र पदवी व पदविका | शासकीय औषधनिर्माण महाविद्यालय, कराड, कृष्णा इन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, कराड | |

## ४. स्वच्छ भारत अभियांनांतर्गत परिसर साफसफाई उपक्रम –

विभागातील सर्व संस्थानी महिन्यातील तिसरा शनिवार (त्या दिवशी शासकीय सुटटी असल्यास महिन्यातील पाचवा शनिवार) हा संस्था परिसर सफाईकरीता निश्चित करावा. त्या दिवशी संस्थेतील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी आणि संस्थेतील वर्ग सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांनी संस्था परिसराची साफसफाई करावी आणि त्याचा अहवाल सोबत दिलेल्या गुगल फॉर्मच्या माध्यमातून वेळोवेळी विभागीय कार्यालयास सादर करावा. (https://forms.gle/HvcmMZDhwc5tqsrj8)

## ५. विभाग स्तरीय ग्रीन कॅम्पस (हरित कॅम्पस) स्पर्धा –

विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व तंत्रशिक्षण संस्थांची ग्रीन कॅम्पस (हरित कॅम्पस)स्पर्धा आयोजित करावयाची आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | स्पर्धा समन्वयक संस्था | स्पर्धा कालावधी | स्पर्धेचा तपशील |
|---|---|---|---|
| १ | अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे | फेब्रुवारी २०२२ | संस्थेच्या परिसरातील कार्बन उत्सर्जन, सांडपाण्याची व कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट, वॉटर री सायकलिंग, सौर ऊर्जेचा वापर, वीज बचत करणारी यंत्रणा, जलसंधारण , बायो टॉयलेट इत्यादी. |

**६. विभाग स्तरीय- विविध सामाजिक उपक्रम राबविणे-**

या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व संस्थांनी वृक्ष लागवड, रक्तदान शिबीर, कोविड बाबत जनजागृती अभियान इत्यादी उपक्रम राबवावेत, असे उपक्रम राबवित असताना भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा लोगो आणि टॅगलाईन ठिकठिकाणी प्रदर्शित करावा. तसेच वेळोवेळी त्याचा अहवाल सोबत दिलेल्या गुगल फॉर्म च्या माध्यमातून या कार्यालयास सादर करावा. (https://forms.gle/6hPrJDo1aZGBrqgL9)

**७. राज्य स्तरीय हेकाथॉन स्पर्धा-**

या स्पर्धेच्या राज्यस्तरीय समन्वयाची जबाबदारी पुणे विभागाकडे आहे. स्पर्धेचे समन्वयन अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे ही संस्था अन्य विभागातील स्वायत्त अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या सहकार्याने करेल. त्याचा तपशिल अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी स्वतंत्ररित्या सर्व संस्थांना कळवावा. स्पर्धेच्या अंतिम फेरीचे आयोजन मार्च २०२२ पूर्वी अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांनी करावयाचे आहे.

**८. राज्य स्तरीय डिजिटल साक्षरता अभियान – तंत्र शिक्षण संचालनालय अंतर्गत संस्थांद्वारे सामान्य नागरींकासाठी डिजिटल साक्षरता अभियान राबविणे –**

विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील सर्व सस्थानी (विद्यार्थ्यी व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी ) हे डिजिटल साक्षरता मिशन राबवावे. (सदर उपक्रम राबविताना माहिती व तंत्रशिक्षण विभागाची मदत घ्यावयाची आहे.) प्रौढांना तसेच इतर गरजूंना (जसे की शेतकरी, मजूर, छोटे व्यवसायिक, गृहिणी) वाढत्या डिजिटल जगात संवाद साधण्यासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यात मदत करणे हा या उपक्रमाचा हेतू असून सदर उपक्रमात खालील बाबींचा समावेश असावा.

१. आपले सरकार पोर्टल व त्याद्वारे नागरिकांना मिळणाऱ्या सुविधा , डिजिटल सातबारा, वाहन अनुज्ञप्ती, आधार संलग्नता.
२. ऑनलाईन पद्धतीने देयके अदा करण्याची सुविधा उपलब्ध असणाऱ्या विविध यंत्रणा - स्वयंपाकाचा गॅस, टेलीफोन, वीज देयक, मालमत्ता कर, आय कर इ.
३. अॅप ची संकल्पना व त्याचा वापर करताना घ्यावयाची खबरदारी
४. ऑनलाईन बँकिंग, एस एम एस सुविधेचे महत्व, टू फॅक्टर ऑथोरायझेशन चे महत्व
५. हॅकिंग, इमेल व एस एम एस द्वारे होणारे गुन्हे व त्यासंदर्भात घ्यावयाची खबरदारी.

केंद्र शासनाने प्रत्येक घरात किमान एक व्यक्ती डिजिटल साक्षरता कौशल्यांसह साक्षर असावी या उद्देशाने ही योजना सुरू केली असल्याने शासनाने राज्य स्तरीय डिजिटल साक्षरता अभियान तंत्र शिक्षण संचालनालय अंतर्गत संस्थांद्वारे सामान्य नागरींकासाठी डिजिटल साक्षरता अभियान राबविणे.

सदर उपक्रम राबविण्यासाठी विभागातील इतर संस्थांना मुभा असेल परंतू शासनाकडून आर्थिक पाठबळ उपलब्ध होणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच उपक्रम ४,५,६ व ८ राबविणे सर्व संस्थासाठी बंधणकारक आहे.

(डॉ.द.व्यं जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.

प्रत- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई. यांना माहितीसाठी.